**MHAH080021572024**

<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ९९१/२०२४ मधील निशाणी २८ खालील आदेश.</u>

वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादीं विरुध्द जाहिर ठराव व मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज न्यायप्रविष्ठ करुन विनंती केली आहे की, वादीने त्याच्या दाव्यामध्ये दाव्यास कारण दि. १५/०९/२०२४ असे दिलेले असुन पॅरा क्र. ८ मध्ये टाईपरायटरच्या टाईपींगच्या चुकीमुळे सदर दाव्यात दि. १५/०८/२०२४ असे झाल्याचे दिसुन येत आहे. परंतु सदर तारीख ही १५/०९/२०२४ असे दुरुस्ती होवून मिळावी यासाठी सदरचा अर्ज केला आहे. सबब, वर नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करणे दाव्याच्या निर्णायक व परिणामकारक आदेशाकरिता आवश्यक असल्याने दुरुस्तीस परवानगी दयावी अशी विनंती वादीने केली आहे.

०२. अर्जाकामी प्रतिवादी यांचे म्हणणे मागविले. प्रतिवादी यांनी अर्जास विरोध करीत म्हणणे दिले आहे की, वादीच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खरा नाही, कायदेशीर नाही, सदर दुरुस्ती मुळे प्रतिवादीवर अन्याय होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज समर्थनीय नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

०३. उपरोक्त नमुद दुरूस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची मागितलेली दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असुन तिच्यामुळे प्रतिवादीच्या हक्कांवर कोणतीही गदा येणार नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये उपरोक्त नमुद दुरूस्तीस परवानगी दिल्याने दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदर प्रकरणात पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे सदर दावा दुरूस्तीस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज ₹.५००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो. वादीने सदर खर्चाची रक्कम प्रतिवादीस द्यावी.

२. वादीने सदरची दुरूस्ती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करुन अभिलेखावर सादर करावी.

३. उभयपक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

KADUSKAR DEEPALI PARIMAL
Digitally signed by KADUSKAR DEEPALI PARIMAL
Date: 2025.12.20 12:36:31 +0530

ठिकाण संगमनेर
दिनांक १६.१२.२०२५

(श्रीमती डी.पी.कडुस्कर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
संगमनेर.